# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** पुणे ग्रामीण **P.S.(ठाणे):** खेड
**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0277 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 23/04/2024 04:27

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 22/04/2024
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 22/04/2024
**Time From (वेळेपासून):** 17:05 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:05 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 23/04/2024 **Time (वेळ):** 04:20 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 006
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 23/04/2024 04:20 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** भुमीअभिलेख कार्यालय खेड येथे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** श्रीमती भामा बबन गोपाळे

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1969

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मु पोसाबुर्डी, ता खेड जि पुण,खेड,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मु पोसाबुर्डी, ता खेड जि पुण,खेड,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती सुनंदा गणेश वाजे | | | 1. वाडारोड पाण्याचे टाकीजवळ तारका,रूम नं3राजगुरूनगर ता खेड जि पु,मुळ रा सुरकंुडी ता खेड जि पुणे,खेड,पुणे ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रक्कम रुपये 9000/ रुपयांची | 7,000.00 |

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | | | लाच मागणी करुन तडजोडीअंती 7000/ रुपयांची लाच रक्कम स्वीकारली | |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

7,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक- 23/04/2024

मी श्रीमती भामा बबन गोपाळे वय 55 वर्षे, धंदा शेती, रा मु. पो.साबुर्डी, ता खेड जि पुणे. मोबाईल नंबर- 8888049951.

समक्ष खेड पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण येथे हजर राहुन फिर्याद देते की, मी दिनांक- 22/04/2024 रोजी अँटी करप्शन ब्युरो, पुणे येथे दिलेल्या तक्रारीवरुन अँटीकरप्शन ब्युरो चे पोलिस निरीक्षक श्री. अतुल भोसले यांनी माझी लेखी तक्रार घेतली ती पुढीलप्रमाणे-

''वरिल विषयास अनुसरुन अर्ज करण्यास कारण की, माझे पती श्री बबन हरीभाऊ गोपाळे 2)रत्नाबाई ममतु कावडे 3) सुरेखा सुभाष धनावडे यांचा मुपो साबुर्डी, ता खेड जि पुणे गट नं 245 मध्ये एकुण 63 गुंठे शेतजमीन असुन सदर गटाची मोजणी करण्याकरीता माझे पती बबन हरीभाऊ गोपाळे वय 65 वर्षे, यांनी दिनांक 1/1/2024 रोजी मा. उपअधिक्षक भूमिअभिलेख/नगर भुमापन अधिकारी ता खेड जि पुणे यांना अर्ज दिला होता. सदर मोजणी करण्याकरीता श्रीमती सुनंदा वाजे मॅडम यांनी माझ्याकडे मोजणीची कागदपत्रे बनविण्याकरीता 12 हजार रुपये मागणी केली होती. ती मी कॅश स्वरुपात श्रीमती सुनंदा वाजे यांचे हातात दिले होते त्यानंतर काही दिवसातच पुन्हा श्रीमती सुनंदा वाजे यांनी मला फोनकरुन सांगीतले की, सदरची कागदपत्रे ऑनलाईन फॉर्म भरणे याकरीता आणखिन दोन हजार रुपये दयावे लागतील तेव्हा मी पुन्हा श्रीमती सुनंदा वाजे मॅडम यांना कॅश स्वरुपात दिले.

यानंतर सुमारे तीन महीन्यांनी दिनांक 28/03/2024 रोजी आमचे गट नं 245 मु.पो साबुर्डी ता खेड जि पुणे येथील हद्द कायम करण्याकरीता मोजणी करणयात आली. सदर वेळी श्री नाडेकर साहेब व त्यांचे सोबत इतर दोन इसम हजर होते. यानंतर ते सर्व मोजणी करुन तेथुन निघुन गेले त्यांनतर पुन्हा श्रीमती सुनंदा वाजे मॅडम यांनी मला कॉल केला व मला मोजणी झाली का असे विचारले त्यावर मी त्यांना हो मोजणी झाली असे म्हणल्यावर त्यांनी मला म्हणाले, मला साहेबांचा आत्ताच फोन आला होता की, तुम्हाला मोजणी करीता आणलेल्या मशिनची सहा हजार रुपये दयावे लागतील त्यावर मी श्रीमती वाजे मॅडम यांना म्हणाले की, मी बारा हजार रुपये मोजणीचे भरलेले आहेत. मग आता कसले पैसे त्यावर त्या म्हणाल्या की मशिन बाहेरुन आणावी लागते. त्यामुळे मशिनचे सहा हजार रुपये व तुमचे पेपर तयार करण्याचे तीन हजार रुपये असे एकुण नऊ हजार रुपये घेऊन आज खेड येथील ऑफीसला या. तुमची कागदपत्रे तुम्हाला देते असे म्हणाले.

श्रीमती सुनंदा वाजे मॅडम यांनी माझेकडे मागितलेले नऊ हजार रुपये रक्कम ही लाच रक्कम असुन ती मला लोकसेवकाला देण्याची इच्छा नाही तरी आपण आपले विभागामार्फत त्यांचेवर योग्य ती कारवाई करावी ही नम्र विनंती.

माझा वरील अर्ज मला लिहता व वाचता येत नसल्यामुळे तो मला वाचुन दाखविला तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर लिहला असुन तो पंचासमक्ष वाचुण दाखविला.''

मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी करण्यासाठी पोलिस निरीक्षक श्री अतुल भोसले यांनी माझेसोबत

व्हाईस रेकॉर्डर दिला तसेच त्यांच्यासोबत असलेल्या शासकीय पंचांपैकी पंच नं-1 म्हणुन श्री. पंकज सुधिर माडीवाले वय 42 वर्षे, धंदा नोकरी, पद- वरिष्ठ लिपीक, गृहनिर्माण विभाग, (म्हाडा) क्षेत्र विकास मंडळ, पुणे. यांना माझ्यासोबत देवुन उपअधिक्षक भूमिअभिलेख खेड येथे कामास असलेल्या लोकसेवक श्रीमती सुनंदा वाजे व लोकसेवक श्री नाडेकर यांना भेटण्यासाठी रवाना केले. त्यावेळी उपअधिक्षक भूमिअभिलेख खेड कार्यालयात काम करणा-या श्रीमती सुनंदा वाजे यांचेशि माझी भेट झाली त्यावेळी त्यांनी मला झालं का काम असं विचारले असता मी त्यांना म्हणाले, नाही भाऊ ला सांगितलंय, भाऊ म्हणाला मी करतो असे म्हणाल्यावर श्रीमती सुनंदा वाजे म्हणाल्या की, तुम्ही मग त्यांच्याकडे जाऊन या, माझ्या हातात अजुन नाही आलं काम, तुमच्या भावा कडं जाऊन या असे म्हणाले व त्यांनतर श्री नाडेकर साहेब यांना श्रीमती सुनंदा वाजे यांनी फोन लावुन मी आल्याबाबत त्यांना कळविले. त्यांनतर त्यांनी मला फोन करते तुला असे सांगुन तुम्ही भवाकडं या जाऊन असे सांगीतले. त्यांचेशी कामासंबंधाने चर्चा केली. त्यानंतर मी पुन्हा पोलिस निरीक्षक अतुल भोसले व त्यांचे पथक थांबलेल्या ठिकाणी परत येवुन घडलेली हकिगत सांगितली. त्यावेळी श्री भोसले साहेब पोनि लाप्रवि पुणे यांनी माझे कडील व्हाईस रेकॉर्डरमधील रेकॉर्डींग ऐकले. सदरचे रेकॉर्डींग ऐकले असता पडताळणी कारवाई दरम्यान माझे व उपअधिक्षक भूमिअभिलेख खेड येथे काम करणा-या श्रीमती सुनंदा वाजे यांचे भेटीदरम्यान माझ्या कामाबाबत चर्चा झाली नसुन लाचेसंदर्भात स्पष्टता झाली नाही तसेच लोकसेवक श्री नाडेकर यांची भेट झाली नसल्याने मला श्रीमती सुनंदा वाजे यांनी दुपारी 4:00 वाजता बोलावले असल्याने पुन्हा पडताळणी करता पाठविण्याचे ठरविण्यात आले.
त्यानंतर श्री अतुल भोसले पोनि लाप्रवि पुणे यांनी माझा मोबाईल क्र. 8888049951 वरुन श्रीमती सुनंदा वाजे यांचे मोबाईल क्र. 8668389364 यावर कॉल लावण्यास सांगुन साहेब आले आहेत का नाही याबाबत विचारणा करण्याकरीता सांगीतले असता मी फोन केला ती वेळ सुमारे 15:17 वाजणेचे होती. त्यावेळी मी म्हणाले, सुनंदा आलेत का साहेब पेपर घेऊन, त्यावर श्रीमती वाजे म्हणाल्या, कुठंय तुम्ही, त्यावर मी म्हणाले, आईकडं आलेय त्यावर श्रीमती वाजे म्हणाल्या, सकाळी तुमच्यासोबत कोण आलते, त्यावर मी म्हणाले, माझे सोबत कोण नव्हतं, मी एकटीच होते त्यावर श्रीमती वाजे म्हणाल्या, एक माणुस होता तो, मी पाहीला त्याला, तुम्ही आले तेव्हाच तो आला, अन तुम्ही गेला तेव्हाच तो गेला तुमच्या मागे असे म्हणाल्या, त्यावर मी म्हणाले हा का कोण मला नाही माहीत. त्यावर श्रीमती वाजे म्हणाल्या, हा का तुम्ही एकटयाच या मी तुम्हाला येताना पाहीलं त्या माणसांबरोबर, म्हणुन असं वाटलं ओ. नाहीतर काहीतरी आक्षेप घ्यायचे विनाकारण, त्यावर मी म्हणाल्या, पैसे पुर्ण नाही येत, त्यावर श्रीमती वाजे म्हणाल्या, किती आहेत, त्यावर मी म्हणाल्या, सगळे हायेत सात त्यावर श्रीमती वाजे म्हणाल्या, मग बाकीचे दोन, त्यावर मी म्हणाल्या, बघु ना नंतर, बघल कोणाकडं तरी, साहेब आलेत का पेपर घेऊन त्यावर श्रीमती वाजे म्हणाल्या, नाही अजुन, चार वाजेपर्यंत येतील. असे माझेत व श्रीमती सुनंदा वाजे मध्ये फोनव्दारे संभाषण झाले असुन ते व्हाईस रेकॉर्डव्दारे ध्वनिमुद्रीत करण्यात आले आहे.
त्यानंतर 16:19 वा.चे सुमारास माझ्या मोबाईल फोनवर श्रीमती सुनंदा वाजे यांचा फोन आला त्यावेळी श्री अतुल भोसले पोनि लाप्रवि पुणे यांनी लागलीच व्हाईस रेकॉर्डर चालु करुन सदरचा फोन कॉल रेकॉर्डवर घेण्यात आला आहे त्यावेळी श्रीमती सुनंदा वाजे म्हणाल्या, येता, त्यावर मी म्हणाले, हा आलेत का साहेब, त्यावर श्रीमती वाजे म्हणाल्या, हा गेले लगेच, त्यावर मी म्हणाले, कुठं? त्यावर श्रीमती वाजे म्हणाल्या, काय माहीत त्यांना कुठं, मोजणीवर जायचंय त्यावर मी म्हणाले, आता भेटणार नाही का तिथं, त्यावर श्रीमती वाजे म्हणाल्या, ते भेटले त्यांनी माझ्याकडं ठेवुन दिला, ते म्हणाले मॅडम तुमच्याकडं ठेवा, त्यांना कुठं मोजणीवर जायचंय, ठेवु का असे म्हणुन फोन ठेवुन दिला. त्यानंतर श्री अतुल भोसले यांनी व्हाईस रेकॉर्डर बंद केला.
त्यानंतर मी श्रीमती सुनंदा वाजे यांना लावलेला फोन कॉल व श्रीमती सुनंदा वाजे यांचा माझे मोबाईलवर आलेला फोन कॉल यावर झालेल्या संभाषणावरुन श्रीमती सुनंदा वाजे या लोकसेवक श्री नाडेकर यांचेकरीता 9000/- हजार रुपये लाच मागणी केल्याचे झाले पडताळणीवरुन निष्पन्न झाले आहे. मी श्रीमती वाजे यांना 7000/- रुपये जमा झाले असल्याबाबत सांगीतल्याने सदरची रक्कम घेऊन उपअधिक्षक भूमिअभिलेख खेड येथे श्रीमती वाजे यांनी बोलावले असल्याने श्री अतुल भोसले पोनि लाप्रवि पुणे यांनी पंच व पडताळणी पथकाची चर्चा करुन त्वरीत सापळा कारवाई आयोजित करण्याचा निर्णय घेतला. तसेच श्रीमती सुनंदा वाजे यांना पंच क्र.1 श्री माडीवाले यांचा संशय आल्याने माझे सोबत पंच क्र.2 श्री निंबाळकर यांना पाठविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.
पोलिस निरीक्षक भोसले यांनी मला लाच मागणी झालेली रक्कम 7,000/- रुपये मला हजर करणेस सांगितली त्याप्रमाणे 500/- रुपये दराच्या 14 नोटा मी पोलिस निरीक्षक श्री भोसले यांचेकडे दिल्या. त्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन माझेकडे परत दिल्या. व माझे सोबत व्हाईस रेकॉर्डर देवुन शासकीय पंच क्र.2 श्री निंबाळकर यांचेसोबत सदरची लाच रक्कम श्रीमती सुनंदा वाजे यांना देण्यासाठी उपअधिक्षक भूमिअभिलेख खेड येथे रवाना केले. व माझे पाठोपाठ पोलिस निरीक्षक भोसले व त्यांचे पथक उपअधिक्षक भूमिअभिलेख खेड येथील कार्यालयाचे

आजुबाजुला येवुन थांबले.

"मी व पंच क्र.2 श्री. निंबाळकर असे आम्ही श्रीमती सुनंदा वाजे यांना लाचेची रक्कम देण्यासाठी उपअधिक्षक भूमिअभिलेख खेड येथे गेलो असता श्रीमती सुनंदा वाजे यांना भेटले. त्यावेळी मी त्यांना म्हणाले साहेबां बरोबर बोलणं होईल का? त्यावर श्रीमती वाजे म्हणाल्या, देते मावशी मी त्यावर मी म्हणाले, ते झालं पण आता मी आता परत मी थोडं बोलल्यावर, ते म्हणतील ना चला बाबा दिल्यात म्हणुन. त्यावर श्रीमती वाजे म्हणाल्या, मी देणार मी देणार त्यांना लगेच मला काय करायचंय मी देते ना, मी पहीलंच सांगीतलंय मला काय काडीचा फायदा नाही मी सांगते ना तुम्हाला मी देते नंतर तुमचं बोलणं करुन,मी सांगते ना तुम्हाला असे म्हणल्या त्यानंतर आमचेत इतर चर्चा झाली त्यावर श्रीमती वाजे म्हणाल्या आणलेत ना, त्यावर मी म्हणाले, भाऊनी सकाळी दिलेत, त्यावर श्रीमती वाजे म्हणाल्या किती येत, त्यावर मी म्हणाले, सात येत, असे म्हणुन मी त्यांना माझ्या पिशवीतील पांढ-या रंगाचे पाकीटामधील लाच रक्कम काढुन त्यांना उजव्या हाताने काढुन दिली ती श्रीमती सुनंदा वाजे यांनी त्यांचे उजव्या हाताने स्विकारुन त्यांचे पर्स चे पुढील कप्यात ठेवुन दिले. व मला माझे मोजणी पुर्ण झाल्याचा नकाशा व कागदपत्रे माझ्या ताब्यात दिली. आम्ही दोघी बाहेर अथर्व झेरॉक्स मशिन वाल्याचे दुकानात जाऊन थांबलो व तेथे कलर झेरॉक्स काढल्या. व त्यांनतर श्रीमती सुनंदा वाजे या त्याचे कार्यालयात निघुन गेले व पथकातील श्रीमती तुपे मॅडम यांना इशा-याने श्रीमती सुनंदा यांनी पैसे घेतलेबाबत सांगीतले. त्यांनतर सर्व सापळा पथक यांनी श्रीमती सुनंदा वाजे यंाना ताब्यात घेतले व त्याचे नाव व पद विचारले असता त्याने त्याचे पुर्णनाव श्रीमती सुनंदा गणेश वाजे वय 32 वर्षे, धंदा –नोकरी, खाजगी टायपिस्ट, भुमि अभिलेख कार्यालय ता खेड जि पुणे. राहणार वाडा रोड, पाण्याचे टाकीजवळ, तारकाई 2, रुम नं 3 मुळ रा मु.पो सुरकुंडी ता खेड जि पुणे असे सांगितले. त्यांनतर पोलिस निरीक्षक श्री भोसले यांनी तेथे तात्काळ पुढील चौकशी करुन कागदपत्रा विषयी माहिती घेवुन श्रीमती सुनंदा वाजे यास ताब्यात घेवुन खेड पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण याठिकाणी येवुन पंचनामा व इतर कार्यवाही पुर्ण केली.

तरी, दिनांक 28/03/2024 रोजी आमचे गट नं 245 मु.पो साबुर्डी ता खेड जि पुणे येथील हद्द कायम करण्याकरीता मोजणी झालेला नकाशा व हद्दकायम पत्र मिळणेसाठी श्रीमती सुनंदा वाजे यांनी दिनांक- 22/04/2024 रोजीचे 17:05 वाजेच्या दरम्यान उपअधिक्षक भूमिअभिलेख खेड या ठिकाणी लोकसेवक असल्याचे भासवुन भुमिअभीलेख कार्यालयात टायपीस्ट असल्याचा कामाचा फायदा घेऊन लोकसेवक श्री नाडेकर साहेब यांचेसाठी व त्यांचेवतीने रक्कम रुपये 9000/- रुपयांची लाच मागणी करुन तडजोडीअंती 7000/- रुपयांची लाच रक्कम भुमी अभिलेख कार्यालय खेड येथे माझ्याकडुन स्विकारली आहे म्हणुन त्यांचेविरुद्ध माझी फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मला वाचुन दाखविली ती माझे सांगणेप्रमाणे टाईप करण्यात आली असुन ती बरोबर आहे.

समक्ष- तक्रारदार यांची सही,

दाखल अंमलदार -- सपोनि काबुगडे खेड पोलीस स्टेशन
तपासी अंमलदार- पोलीस निरीक्षक अतुल श्रीधर भोसले लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

RAJKUMAR BALAJI KENDRE(I (Inspector)) / POBN70363 **or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank (**पद**):** **No.(**क्र.**):**

**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

मान (वाचन ) ?।४।०७

**15.Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
खेड पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** RAJKUMAR BALAJI KE
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN70363

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**